पुढारी शहर-जिल्हा सिंधुदुर्ग, मंगळवार ,१९ एप्रिल २०२२



शिरंगे येथे श्रमसंस्कार शिबिरात सामील विद्यार्थी व शिक्षक वर्ग.

# हळबे महाविद्यालयचे निवासी श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर २२ ते २८ मार्च कालावधीत शिरंगे येथे घेण्यात आले. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, शिस्त, स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, राष्ट्रीय एकात्मता, समता, सहकार्याची भावना व सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्फत हे शिबिर घेण्यात येते.

ग्रामस्वच्छता, आरोग्य तपासणी शिबिर, कृषी योजनांची माहिती, वनराई बंधारे व इतर प्रबोधनात्मक कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला होता. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी शिरंगे पुनर्वसन येथील संपूर्ण गावात फिरत हे प्रबोधनात्मक कार्यक्रम केल.सांस्कृतिक कार्यक्रमातून अनेक समाजसुधारक बोध नाटिका, नृत्य, गायन असे कार्यक्रम घेण्यात आले.